**तातडीचे / तात्काळ**
**अर्थसंकल्पीय अंदाज**

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/आयुक्त-
दिनांक :

**परिपत्रक**

सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : **सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

आपणांस कळविणेंत येते की, सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी सोबतच्या प्रपत्रात आपल्या विभागासंबंधीची माहिती दिनांक **१५.१०.२०१०** पुर्वी पोहचेल अशा बेताने पाठवावी.

सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना विशेष काळजी घेण्यांत यावी. नित्याची बाब म्हणून आपल्या अधिनस्त कर्मचा-यांनी सरसकटपणे तयार केलेले अंदाज तसेच न पाठविता विभाग प्रमुखांनी काटेकोरपणे स्वतः जातीने लक्ष घालून अंदाजामध्ये अचूकपणा, वास्तवता असावी तसेच अंदाज हे प्रत्यक्ष रकमांचे जास्तीत जास्त जवळचे असावेत यासाठी दक्षता घ्यावी. सन २०१०-२०११ चे सुधारित अंदाज व सन २०११-२०१२ चे मूळ अंदाज तयार करण्यासाठी माहिती पाठवितांना पुढील बाबींचा विचार करावा.

७४ व्या घटना दुरुस्तीनुसार अधिनियमाच्या कलम २९ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार महापालिका क्षेत्रात ९ प्रभाग समित्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. प्रभाग समित्यांचे कामकाज प्रभावीरित्या होणेसाठी प्रभाग समितीनिहाय अर्थसंकल्पीय अंदाजासाठी स्वतंत्र तरतुदी करणे आवश्यक आहे. तसेच प्रभाग समितीचे कार्यक्षेत्रातील कामांचे व इतर सेवांवरील खर्चाचे अंदाज प्रभाग समितीचे शिफारशीसह आल्यानंतर त्या प्रस्तावानुसार आयुक्तांचे एकत्रित अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणेंत येतील. त्यासाठी प्रत्येक विभाग प्रमुखाने आपल्या नियंत्रणाखालील लेखाशीर्षाखाली प्रत्येक प्रभाग समितीनिहाय तरतुदींचे वाटप करुन प्रभाग समितीकडे दि. १५.१०.२०१० पुर्वी पाठवावे. म्हणजे त्यानुसार प्रभाग समितीला अर्थसंकल्पीय अंदाज तयार करता येतील. प्रभाग समिती कार्यक्षेत्रासाठी करावयाच्या तरतुदी नमुना नं.२ (अ) व नमुना २ (ब) मध्ये अनुक्रमे २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११ -२०१२ या आर्थिक वर्षासाठी देण्यांत याव्यात.

**१. मालमत्ता कर (घरपट्टी) :** मालमत्ता कराचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना थकीत मागणी, चालू मागणी व नव्याने होणा-या मालमत्तांची मागणी , सन २०१०-११ मध्ये प्राप्त झालेल्या उत्पन्नामध्ये थकीत मागणीचे उत्पन्न किती ? चालू मागणीचे उत्पन्न किती ? तसेच अपेक्षित उत्पन्नामध्ये थकीत मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल व चालू मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल ? सन २०११-२०१२ मध्ये अपेक्षित

करण्यांत येणा-या उत्पन्नामध्ये थकीत मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल व चालू मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल ? हे विचारात घेऊन जास्तीत जास्त वसुली हिशेबात घेऊन तरतुदी प्रस्तावित करण्यांत याव्यात व याची सविस्तर माहिती तसेच खालील मुद्दयांची सविस्तर माहिती सोबत देण्यांत यावी.

१) प्रभागनिहाय वसुलीचे इष्टांक
२) महिनानिहाय वसुलीचे इष्टांक
३) कर्मचारीनिहाय वसुलीचे इष्टांक
४) अतिरिक्त कर्मचा-यांची आवश्यकता
५) मालमत्तांचे सर्व्हेक्षण
६) नोटीस देणे /जप्ती करणे
७) निवासी व बिगरनिवासी मालमत्तांची यादी
८) करयोग्य मुल्यामध्ये सुधारणा
९) अधिकृत /अनधिकृत मालमत्तांची यादी
१०) मिळकतींची फेरतपासणी
११) वसुलीसाठी /तपासणीसाठी विशेष दक्षता पथक
१२) शहर विकास विभागाचे सहकार्य
१३) थकीत वसुलीसाठी कठोर उपाययोजना
१४) रस्त्यालगतच्या व्यापारी वापरातील इमारतींची करवसुली

**२. जकात :** जकात करापासूनचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना किंमतीतील वाढ, संगणकीकरण हया बाबी विचारात घेता मिळणारे उत्पन्न प्रस्तावित करण्यांत यावेत. तसेच बृहन्मुंबई व इतर महापालिकांमध्ये आकारण्यांत येणारे जकात दरांचा अभ्यास करुन ज्या ज्या बाबींचे दरात सुधारणा करणे आवश्यक आहे त्या बाबींचे दरात वाढ करण्याबाबत प्रस्तावित करुन प्रस्तावित सुधारित दराने येणारे उत्पन्नाचे अंदाज सुचवावेत.

१) जकात तपासणी पथकामार्फत सन २०१०-११ व सन २०११-१२ मध्ये अपेक्षित दंड वसुलीची रक्कम.

२) जकात नाकानिहाय ,प्रत्येक लेखाशीर्षनिहाय सन २०१०-११ व सन २०११-१२ मध्ये प्राप्त होणारे उत्पन्न.

३) जकात अनुसूचीतील बाबनिहाय सन २०१०-११ व सन २०११-१२ मध्ये प्राप्त होणारे उत्पन्न.

४) उत्पन्न वाढीच्या दृष्टिने जकात नाका तसेच जकात तपासणी पथकनिहाय कोणत्या विशेष उपाययोजना आखल्या आहेत याची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**३. पाणीपट्टी :** पाणी खरेदी व त्याचे वाटपावर होणारा खर्च यामध्ये १०० द.ल.लि.पाणी पुरवठा योजनेच्या व अंतर्गत वितरण व्यवस्थेच्या भांडवली खर्चासाठी उभारलेल्या कर्जाचे हप्ते, त्यावरील व्याज, योजनेची निगा व देखभाल, कर्मचारी आस्थापना, सतत वाढणारे विजेचे आकार हया सर्व बाबींचा खर्च

दिवसेंदिवस वाढत आहे परंतु त्याप्रमाणात पाणी पुरवठयाची वसुली यामध्ये बरीच तफावत आढळते. ही तफावत दूर करण्यासाठी करण्यांत येणा-या ठोस उपाय योजना व त्याप्रमाणे उत्पन्न हिशेबात घेऊन अंदाज प्रस्तावित करावे.

पाणी पुरवठा आकाराचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना थकीत मागणी, चालू मागणी व नव्याने होणा-या मालमत्तांची मागणी , सन २०१०-११ मध्ये प्राप्त झालेल्या उत्पन्नामध्ये थकीत मागणीचे उत्पन्न किती ? चालू मागणीचे उत्पन्न किती ? तसेच अपेक्षित उत्पन्नामध्ये थकीत मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल व चालू मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल ? सन २०११-२०१२ मध्ये अपेक्षित करण्यांत येणा-या उत्पन्नामध्ये थकीत मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल व चालू मागणीपैकी किती उत्पन्न प्राप्त होईल ? हे विचारात घेऊन जास्तीत जास्त वसुली हिशेबात घेऊन तरतुदी प्रस्तावित करण्यांत याव्यात व याची सविस्तर माहिती तसेच खालील मुद्दयांची सविस्तर माहिती सोबत देण्यांत यावी.

१) पाण्याचे अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढून त्याबाबत करण्यांत आलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती.

२) ज्या मोठया गृहसंकुलामध्ये पाण्याचे मीटर बसवून मोजून पाणी देणेबाबत करण्यांत येत असलेली कार्यवाही.

३) थकबाकीदार यांच्यावर करण्यांत आलेली कार्यवाही.

**४. करेतर महसुलाचे अंदाज :** वरील कर व आकाराव्यतिरिक्त महापालिका आकारात असलेल्या इतर बाबींपासून उत्पन्न ( भाडे, शुल्क, फी इ. ) साठी अंदाज प्रस्तावित करतांना चालू बाजारभावानुसार भाडे, सेवा पुरविण्यासाठी येणा-या खर्चाचे प्रमाणात पर्याप्त असे आकार व ज्या ज्या शुल्कामध्ये व फी मध्ये वाढ करण्यांत आली आहे त्याप्रमाणे तपशीलवार प्रस्ताव तयार करण्यांत यावेत व सुधारित दराने येणा-या उत्पन्नाचे अंदाज प्रस्तावित करावेत. **महसुली उत्पन्न जमा करणा-या विभागांनी त्यांचेमार्फत आकारण्यांत येणा-या कर, फी, शुल्क, आकार, दंड इ. चे सध्या मंजूर दरांची व सन २०१०-११ मध्ये प्रस्तावित करण्यांत येणा-या दरांची माहिती सोबत देण्यांत यावी.**

**५. अनुदान / कर्जे :** ज्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पांसाठी शासनाकडून अनुदान मिळते, कर्ज घेण्याचे विचाराधीन आहे त्या योजनानिहाय कर्ज व अनुदानाचे स्वतत्र तपशीलवार माहितीसह अंदाज प्रस्तावित करण्यांत यावे. त्या बाबींसाठी शासनाकडून नियमितपणे अनुदान मिळेत, त्या अनुदानाच्या अनुज्ञेय थकीत रकमेसह तरतूद प्रस्तावित करावी. विकास आराखडयातील कामांसाठी शासनाकडून २३.३३% अनुदान अनुज्ञेय आहे. तरी, विकास आराखडयातील कामांसाठी मिळणा-या अनुदानाची बाबनिहाय माहिती द्यावी. ज्या बाबींसाठी शासनाकडून इतर संस्था / प्राधिकरणे यांच्याकडून अनुदान मिळू शकते त्याबाबतची माहिती घेऊन जास्तीत जास्त अनुदान उपलब्धतेसाठी प्रयत्न करुन मिळणा-या अनुदानाची माहिती द्यावी.

**<u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अनुसार करांचे दर फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेपर्यंत निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे करांचे दरात बदल सुचविण्याचे झाल्यास त्यास मा.महासभेची दि.२०.२.२०११ पुर्वी मंजूरी घेण्याची कार्यवाही करावी व त्याप्रमाणे अंदाजपत्रकात तरतुदी प्रस्तावित कराव्यात.</u>**

**<u>महसुलाच्या नवीन बाबींपासून उत्पन्न अपेक्षित असल्यास त्याबाबतचे तपशीलवार प्रस्तावासह तरतुदी प्रस्तावित करण्यांत याव्यात.</u>**

## <u>खर्च बाजू</u>

१. **आस्थापना खर्च ( वेतन व इतर भत्ते )** : कर्मचारी आस्थापनेवरील खर्चासाठी तरतुदी प्रस्तावित करतांना सुधारित वेतनश्रेणीनुसार द्यावयाचे वेतन, वार्षिक वेतनवाढ, महागाई भत्त्यातील वाढ, बोनस तसेच रिक्त पदे, इतर भत्त्यावरील खर्चासह तरतुदी प्रस्तावित कराव्यात. जादा कामाच्या भत्त्याच्या खर्चावर नियंत्रण ठेवणेसाठी अत्यावश्यक व विहित मुदतीत पूर्ण करावयाच्या कामांसाठी जादा काम करावे लागत असल्यास पुर्वमंजुरीने जादा काम भत्ता मंजूर करण्यांत यावा. जादा कामाच्या भत्त्याबाबत मा.महासभेच्या ठरावांनुसार देय असणा-या विभागासाठी व कर्मचा-यांसाठी जादा कामाच्या तरतुदी प्रस्तावित कराव्यात.

२. **दुरुस्ती, निगा व देखभाल** : विभागाकडील उपकरणे, यंत्रसामुग्री, वाहने यांची दुरुस्ती, निगा व देखभाल तसेच इमारती, रस्ते व इतर बांधकाम, विद्युत दुरुस्ती याबाबत सोबतच्या तक्त्यात तपशीलवार माहिती देवून तरतुदी प्रस्तावित करण्यांत याव्यात. हमी कालावधीत दुरुस्तीसाठी खर्च येत नसल्यामुळे अशा बाबींवरील खर्च अंतर्भुत करण्यांत येवू नये. टाळता येण्याजोग्या बाबींवरील खर्च कमी करुन अंदाज तयार करावेत.

३. **संकीर्ण बाबींवरील खर्च** : संकीर्ण बाबींवरील खर्चासाठी तरतुदी प्रस्तावित करतांना एकाच स्वरुपाच्या बाबींसाठी भिन्न स्वतंत्र लेखाशीर्षाखालील तरतूद प्रस्तावित करण्याची आवश्यकता नसावी. आवश्यकता भासल्यास त्या लेखाशीर्षाखालील तरतुदीमध्ये अंतर्भुत असलेल्या बाबींचे स्वतंत्र विवरणपत्र माहितीसाठी सोबत जोडावे. (उदा. वाहने खरेदी, फर्निचर खरेदी ) भांडारपाल यांनी गणवेष, लेखन साहित्य या बाबींच्या तरतुदींचा विभागनिहाय तपशील सोबत द्यावा.

४. **भांडवली खर्च** : भांडवली कामांच्या तरतुदीमधून नविन कामे घेण्यामध्ये एकंदरीत सर्वांचा कल दिसतो. नविन कामे प्रस्तावित करण्यापुर्वी अपुर्ण कामे व मंजूर झालेली परंतु सुरु न झालेली कामे पूर्ण करुन नागरिकांच्या वापरासाठी उपलब्ध होतील याची दक्षता विभाग प्रमुखांनी घ्यावी. एकंदरीत भांडवली खर्चासाठी तरतुदी प्रस्तावित करतांना कामास प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे, जागेची उपलब्धता आहे व नजिकच्या काळात प्रशासनिक मान्यता मिळण्याची अपेक्षा आहे अशा कामांसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण

झाल्यानंतर, काम सुरु झाल्यानंतर प्रत्यक्षात प्रदानासाठी लागणारी रक्कम लेखाशीर्षनिहाय /कामनिहाय सोबतच्या तक्त्यात तपशीलासह नमूद करण्यांत यावी. सन २०१०-११ मध्ये होणारा अपेक्षित खर्च तसेच स्पीलओव्हरपैकी खर्च होणारी रक्कम विचारात घेऊन तरतुदी प्रस्तावित कराव्यात.

अवास्तव वाढ करुन तरतुदी प्रस्तावित करण्यांत आल्यास त्यामध्ये सुधारणा करावयाच्या झाल्यास त्या तरतुदींचे पुन्हा ९ प्रभाग समितीमध्ये सुधारुन विभाजन करण्यासाठी वेळ जाईल व त्याचा एकूण अर्थसंकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होईल. म्हणून वाजवी व निश्चित तरतुदी प्रस्तावित करण्यांत याव्यात.

अर्थसंकल्पासाठी प्रत्येक लेखाशीर्षाखाली तरतुदी कशा निश्चित करण्यांत आल्या आहेत याबाबतची प्रत्येक लेखाशीर्षनिहाय टिपणी / अहवाल सोबत देण्यांत यावा.

महसुलाच्या / खर्चाच्या कोणत्याही बाबीसाठी अनावधानाने तरतूद करण्याचे राहणार नाही याबाबत पुन्हा पुन्हा खात्री होवून विशेष दक्षता घेण्यांत यावी.

सन २०१०-२०११ चे सुधारित अर्थसंकल्पासाठी मागील ३ वर्षाचे खर्चाचे सरासरी एवढी रक्कम हिशेबात घेऊन , आतापर्यंत मिळालेले उत्पन्न व मार्च २०११ पर्यंत प्राप्त होणारे अपेक्षित उत्पन्न याचा आढावा घेऊन तसेच खर्च बाजूस आतापर्यंत झालेला खर्च व मार्च अखेरपर्यंत अपेक्षित खर्च इ. विचारात घेवून सुधारित अर्थसंकल्पात तरतुदी प्रस्तावित कराव्यात.

अर्थसंकल्पाचे काम प्रभाग समितीने संमत केलेल्या शिफारशीसह तयार होणार असल्यामुळे अर्थसंकल्पीय अंदाज सक्षम प्राधिकरणाकडे संमतीसाठी वेळमर्यादेत पाठविणे आवश्यक असल्यामुळे विभाग प्रमुखांनी माहिती वेळ मर्यादेत पाठविणेची दक्षता घ्यावी. ज्या विभागांकडून माहिती वेळेवर उपलब्ध होणार नाही त्या विभागासाठी तरतुदी करतांना काही त्रुटी राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सन २०१०-२०११ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०११-२०१२ चे मूळ अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा करण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मा.आयुक्त सो. यांचे दालनात सभा आयोजित करण्यांत येणार आहे. संबंधित विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाची संपूर्ण माहिती दिलेल्या दिनांकापुर्वी न चुकता पाठवावी.

उपआयुक्त / सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती यांनी प्रभाग समितीचे अंदाजपत्रक तयार करुन मा.प्रभाग समितीची मान्यता घेऊन दि.३०.११.२०१० पुर्वी प्रभाग समितींचे अंदाजपत्रक मा.आयुक्त यांना सादर करावे.

**नियमित अर्थसंकल्पाबरोबर सन २०११-१२ मधील आऊटकम बजेट, पी बजेट व जेंडर बजेटची माहिती देखील संबंधित विभाग प्रमुखांनी विहित मुदतीत सादर करावी.**

महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

लेखा व वित्त विभाग

दिनांक :१.१०.२०१०

सादर,

सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-१२ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्यासाठी सर्व संबंधित विभाग प्रमुखांकडून माहिती मागविणेसाठी पाठवावयाच्या परिपत्रकाचा मसुदा सोबत मान्यतेस्तव सादर केला आहे. सदर परिपत्रकानुसार नियमित अंदाजपत्रकासाठी आवश्यकती माहिती तसेच आऊटकम बजेट, पी बजेट व जेंडर बजेटची माहिती देखील मागविण्यांत येत आहे. तरी, सोबत जोडलेल्या परिपत्रकावर स्वाक्षरी होणेस विनंती आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

मा.अतिरिक्त आयुक्त सो.,

मा.आयुक्त सो.,

लेखा व वित्त विभाग
दिनांक : २३.८.२०१०

सादर,

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाकडील अध्यापकांना ५०% महागाई भत्ता अदा करावयासाठी सन २०१०-११ च्या अंदाजपत्रकातील तरतूद अपुरी असल्याने पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आरोग्य विभागाने सादर केला आहे. मा.स्थायी समितीच्या मान्यतेनंतर सदरच्या बिलांचे प्रदान करण्याबाबत आपण आदेश दिले आहेत. परंतु आरोग्य विभागाने अद्यापही आपल्या मान्यतेचा ठराव व त्यानुसार प्रदानासाठी देयके सादर केलेली नाहीत.

सन २००९-२०१० च्या सुधारित अंदाजपत्रकात राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाकडील अध्यापकांना ५०% महागाई भत्ता अदा करावयासाठी तरतूद वाढवून देण्यांत आलेली होती. परंतु ३१ मार्च २०१० पर्यंत आरोग्य विभागाकडून याबाबत कार्यवाही झालेली नाही. तसेच सन २०१०-११ मधील पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव लेखा विभागाकडून दि. रोजीच पाठविण्यांत आलेला आहे. वास्तविक दर आठवडयाला मा.स्थायी समितीची सभा घेण्यांत येते. त्यामुळे आरोग्य विभागाने या बाबत तातडीने कार्यवाही करुन मा.स्थायी समितीकडे प्रकरण मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक होते.

माहितीस्तव सविनय सादर.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : २०.१०.२०१०

प्रति,
नगर अभियंता,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सोबत मा.महापौर सो. यांचे दि.१८.१०.२०१० चे पत्र व श्री.यासीन सुरमे यांचे दि.१३.१०.२०१० चे पत्र पुढील कार्यवाहीसाठी आपणांकडे पाठविण्यांत येत आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : २२.१०.२०१०

प्रति,
नगर अभियंता,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सोबत मा.महापौर सो. यांचे दि.१९.१०.२०१० चे पत्राची प्रत सोबत जोडली आहे.सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रकाचे वेळी डोंगराळ भाग विकास कामे या लेखाशीर्षांतर्गत असलेल्या स्पील ओव्हरच्या खर्चाचा समावेश करण्यांत यावा ही विनंती.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

लेखा व वित्त विभाग

दिनांक : १५.१०.२०१०

सादर,

सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील माहे सप्टेंबर २०१० अखेर जमा /खर्चाचा अहवाल सादर केला असता आर्थिक वर्षातील ६ महिन्याचा कालावधी संपला असून देखील भांडवली खर्च अत्यल्प झालेला दिसून येत आहे. सदर अहवालावर आदेशित केल्यानुसार कमी खर्च झालेल्या विभाग प्रमुखांना द्यावयाची पत्रे सोबत मान्यतेस्तव ठेवली आहे. मान्य असल्यास कृपया स्वाक्षरी होणेस विनंती आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

मा.अतिरिक्त आयुक्त सो.,

मा.आयुक्त सो.,

**तातडीचे / तात्काळ**
**अर्थसंकल्पीय अंदाज**

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : २६.१०.२०१०

**स्मरणपत्र क्रमांक १**

सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : **सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

**संदर्भ : लेखा विभागाकडील परिपत्रक क्रमांक ठामपा/लेखा/आयुक्त -९६३ दिनांक ११.१०.२०१०**

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रान्वये सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-१२ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजासाठी दि.१५.१०.२०१० पर्यंत माहिती मागविण्यांत आली होती. अद्याप आपल्या विभागाकडील माहिती प्राप्त झालेली नाही. तरी, दिनांक ३०.१०.२०१० पर्यंत लेखा विभागात माहिती पाठविण्यांत यावी.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |
| १६ | महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च करण्यांत यावी. या शासकीय आदेशानुसार गत तीन वर्षात सन २००७-०८ ते २००९-१० महानगरपालिकेला एकूण किती उत्पन्न प्राप्त झाले आहे व प्राप्त झालेल्या उत्पन्नांपैकी ५ टक्के प्रमाणे किती रकमेचा विनियोग मागासवर्गीयांसाठी राबविण्यांत येणा-या कोणकोणत्या कल्याणकारी योजनांवर करण्यांत आला. | महापालिका उत्पन्न<br>सन २००७-०८ रु. ६४७.८२ कोटी<br>सन २००८-०९ रु. ६९९.३६ कोटी<br>सन २००९-१० रु. ७६१.३८ कोटी<br><br>५ % प्रमाणे येणारा निधी<br>सन २००७-०८ रु. २२.१८ कोटी<br>सन २००८-०९ रु. २३.३६ कोटी<br>सन २००९-१० रु. २२.३७ कोटी<br><br>प्रत्यक्ष खर्च<br>सन २००७-०८ रु. १४.२४ कोटी<br>सन २००८-०९ रु. ३१.८७ कोटी<br>सन २००९-१० रु. १२.१८ कोटी<br>राबविण्यांत आलेल्या योजनांचा तपशील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध होईल. |
| रु. | अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी महानगरपालिकेकडून शासनाच्या कोणकोणत्या कल्याणकारी योजना /उपक्रम राबविले जातात, राबविण्यांत येणा-या कल्याणकारी योजनासाठी गत तीन वर्षात (सन २००७-०८ ते २००९-१०) शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आहे व प्राप्त झालेल्या निधीतून अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी कोणकोणत्या कल्याणकारी योजनांची कामे करण्यांत आली आहेत ? | दलित वस्ती सुधारणा या अंतर्गत प्राप्त व खर्च झालेला निधी खालीलप्रमाणे.<br>शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान<br>सन २००७-०८ रु. १.४२ कोटी<br>सन २००८-०९ रु. २.०३ कोटी<br>सन २००९-१० रु. १.७९ कोटी<br>प्रत्यक्ष खर्च<br>सन २००७-०८ रु. १.५२ कोटी<br>सन २००८-०९ रु. २.०९ कोटी<br>सन २००९-१० रु. १.९६ कोटी<br>राबविण्यांत आलेल्या योजनांचा तपशील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध होईल. |

| | | |
|---|---|---|
| २० | राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार योजनेकरीता केंद्राकडून कर्ज व अनुदान या स्वरुपात मिळणारे अर्थसहाय्य याबाबतचे निकष व स्वरुप काय आहेत ? या योजनेंतर्गत गेल्या तीन वर्षात महानगरपालिकेस शासनाकडून किती अनुदान प्राप्त झाले, प्राप्त झालेल्या अनुदानाच्या विनियोग कोणत्या बाबीवर केला आहे. त्यापैकी किती कामे पूर्ण झाली आहे. | राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार योजनेकरीता केंद्राकडून कर्ज व अनुदान या स्वरुपात ठाणे महानगरपालिकेस कोणतीही रक्कम प्राप्त झाली नाही. |

**तातडीचे / तात्काळ**
**अर्थसंकल्पीय अंदाज**

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : ११.११.२०१०

**<u>स्मरणपत्र क्रमांक २</u>**

सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : **सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

**संदर्भ : लेखा विभागाकडील परिपत्रक क्रमांक ठामपा/लेखा/आयुक्त -९६३ दिनांक ११.१०.२०१०**

**स्मरणपत्र क्रमांक १ ठामपा/लेखा/मुलेविअ-१०३३ दि.२६.१०.२०१०**

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रान्वये सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-१२ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजासाठी दि.३०.१०.२०१० पर्यंत माहिती मागविण्यांत आली होती. अद्याप आपल्या विभागाकडील माहिती प्राप्त झालेली नाही. पुढील आठवडयापासून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे अंदाजपत्रकावरील चर्चेचे आयोजन करावयाचे आहे तरी, दिनांक १५.११.२०१० पर्यंत आपल्या विभागाची माहिती लेखा विभागात पाठविण्यांत यावी.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**तातडीचे / तात्काळ** ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**मा.महासभा प्रश्न** ठामपा/लेखा/मुलेविअ-

दिनांक : १९.१०.२०१०

प्रति,
उपआयुक्त - घनकचरा व्यवस्थापन
अधीक्षक अभियंता - पाणी पुरवठा विभाग
श्री.गीते - कार्यकारी अभियंता - मलनिःसारण
कार्यकारी अभियंता - सर्व प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : मा.महासभेने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे / माहिती देणेबाबत.

**संदर्भ : सन्मा.सदस्य श्री.सुरेश चंदू कांबळे यांचे दि.६.९.२०१० चे पत्र**

**या कार्यालयाचे पत्र क्रमांक ठामपा/लेखा/मुलेविअ-९१० दि.२०.९.२०१०.**

**उपरोक्त विषयाचे सन्मा.सदस्यांच्या पत्राची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. लेखा विभागाकडील उपरोक्त पत्रान्वये सन्मा.सदस्यांना माहिती उपलब्ध करुन देणेबाबत यापुर्वीच कळविण्यांत आले होते. याबाबत कार्यकारी अभियंता - सर्व प्रभाग समिती यांना नगर अभियंता यांनी देखील पत्रान्वये कळविले होते. परंतु अद्यापही प्रकरणी माहिती मा.महासभेसाठी उपलब्ध झालेली नाही. तरी, दि.२०.१०.२०१० पर्यंत सदरची माहिती लेखा विभागात २ प्रतीत सादर करावी.**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**तातडीचे / तात्काळ**

**मा.महासभा प्रश्न**

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : २४.११.२०१०

प्रति,
उपआयुक्त - घनकचरा व्यवस्थापन
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : मा.महासभेने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे / माहिती देणेबाबत.

**संदर्भ : सन्मा.सदस्य श्री.सुरेश चंदू कांबळे यांचे दि.६.९.२०१० चे पत्र**

**आपले पत्र क्रमांक ठामपा/वै.अ./घकव्य -४६७ दि.१९.११.२०१०**

**महोदय,**

**आपले विभागाकडील उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने कळविण्यांत येते की, आपण मागासवर्गीय निधीअंतर्गत करण्यांत आलेल्या कामांची मोघम माहिती दिली असून सन्मा.सदस्यांनी या निधीअंतर्गत करण्यांत आलेल्या कामाची सविस्तर माहिती मागविली आहे. तरी, त्याप्रमाणे माहिती त्वरीत लेखा विभागात २ प्रतीत सादर करावी ही नम्र विनंती.**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : १२.११.२०१०

प्रति,
नगर अभियंता,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सोबत मा.महापौर सो. यांचे दि.१०.११.२०१० चे पत्राची प्रत सोबत जोडली आहे.सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे पुनर्विनियोजन प्रस्तावामध्ये सदर खर्चाचा समावेश करण्यांत यावा ही विनंती.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : २४.११.२०१०

प्रति,
मा.नगर अभियंता सो.,
मा.सहाय्यक संचालक नगर रचना सो.,
समाज विकास अधिकारी,
JNNURM CELL
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : **राज्यातील विविध गृहनिर्माण योजनांसाठी आवश्यक निधी उभारण्याकरीता महाराष्ट्र निवारा निधी ची स्थापना करणेबाबत.**

संदर्भ : **महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन निर्णय क्रमांक नानिफ २००८/प्र.क्र.२१३/गृनियो २ दिनांक ३१ मे २०१०**

**महोदय,**

**उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. सदर निर्णयात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र निवारा निधीतून ठाणे महानगरपालिका हद्दीतील शहरी /ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टय दुर्बल /अल्प उत्पन्न गट /मध्यम उत्पन्न गट यांचेकरीता गृहनिर्माण योजनांकरीता निधी उपलब्ध होऊ शकेल किंवा कसे ? याबाबत माहिती घेऊन त्याबाबतची कार्यवाही करण्यांत यावी ही नम्र विनंती.**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**तातडीचे / तात्काळ**
**अर्थसंकल्पीय अंदाज**

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
ठामपा/लेखा/मुलेविअ-
दिनांक : २६.११.२०१०

## स्मरणपत्र क्रमांक ३

सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : **सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

संदर्भ : **लेखा विभागाकडील परिपत्रक क्रमांक ठामपा/लेखा/आयुक्त -९६३ दिनांक ११.१०.२०१०**

**स्मरणपत्र क्रमांक १ ठामपा/लेखा/मुलेविअ-१०३३ दि.२६.१०.२०१०**

**स्मरणपत्र क्रमांक २ ठामपा/लेखा/मुलेविअ-१०८० दि.११.११.२०१०**

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रान्वये सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-१२ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजासाठी दि.१५.११.२०१० पर्यंत माहिती मागविण्यांत आली होती. अद्याप आपल्या विभागाकडील माहिती प्राप्त झालेली नाही. यामुळे अंदाजपत्रकावरील चर्चेच्या आयोजनास विलंब होत आहे. दोन स्मरणपत्रे पाठवूनही आपल्या विभागाकडील अंदाजपत्रकाची माहिती अद्यापही लेखा विभागात प्राप्त झालेली नाही. तरी, दि.२९.११.२०१० पर्यंत लेखा विभागात आपल्या विभागाची माहिती पाठविण्यांत यावी ही विनंती. अन्यथा सदरची बाब मा.आयुक्त सो. यांचे निदर्शनास आणून देण्यांत येईल.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.